# पुणे महानगरपालिका
# * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक २९

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २०/१०/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. ६२९**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन या क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे सप्टेंबर २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. २/३४९ दि.१२/१०/२०२० चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ६३०**

मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.१३/१०/२०२० चे पत्र.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक - सेप्रनि-२००२/प्र.क्र.१४/०२/१२, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. २ सप्टेंबर २००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सध्या शासन सेवेत असलेल्या गट अ, ब आणि क मधील वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकाला संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. याच शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुणे महानगरपालिकेमध्ये कार्यवाही करावी, अशी चर्चा होऊन पुणे महानगरपालिका सेवेत असलेल्या गट अ, ब आणि क मधील वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या अधिकारी / सेवकांना बढ़ती आणि तदनुषंगिक लाभासाठी संगणक अर्हतचे प्रमाणपत्र सादर करण्यास सूट द्यावी असा निर्णय झाला आहे.

सबब वरील शासन निर्णयानुसार पुणे महानगरपालिका सेवेत असलेल्या गट अ, ब आणि क मधील वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या अधिकारी / सेवकांना बढ़ती आणि तदनुषंगिक लाभासाठी संगणक अर्हतचे प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीएमसी-३०२००१/११८४/प्र.क्र २१९/२००१/नवि- २२, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दि.१८ सप्टेंबर २००१ अन्वये पदनिर्मितीस मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामध्ये ज्युनिअर ग्रेड लेखनिक पदासाठी टंकलेखनाची अट विहित करण्यात आली होती. सध्याच्या कालावधीमध्ये टंकलेखन हे कालबाह्य झालेले आहे. तसेच संगणकावर काम करणे सुरू आहे. त्यासाठी सेवकांना MS-CIT अनिवार्य केले आहे. संगणक प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची एका वेतनवाढीची वसूली होत आहे. वय वर्षे ५० पूर्ण झाल्यानंतरच MS-CIT सूट देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने दि.०४/०९/२०१४ रोजी अस्तित्वात आलेल्या पुणे महानगरपालिका सेवा प्रवेश नियमावली पूर्वी कार्यरत असलेल्या ज्युनिअर ग्रेड लेखनिक (लिपिक टंकलेखक) सेवकांना टंकलेखन व MS-CIT परिक्षा उत्तीर्ण या अटीमधून सूट देण्यात यावी.

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ६३१**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/९/२०२० ते दि.३०/९/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/३४४ दि.१२/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ६३२**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील दि.१६ ते ३१ जुलै २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि क्र.५/३४८ दि.१२/१०/२०२० चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ६३३**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ हिंगणे कर्वेनगर व बोपोडी सन २०१६–१७ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तद्नुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/९८६ दि.९/१०/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १५ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. ६३४**

पुणे पेठ पर्वती, फायनल प्लॉट क्रमांक ४९९ व ५००अ स्वारगेट येथील २८ हजार चौ. या जागेवर उभारण्यात येणाऱ्या मल्टी मॉडेल हब या व्यावसायिक संकुल मधून मिळणाऱ्या उत्पन्नातून ४०-५० टक्के हिस्सा पुणे मनापास देणे बंधनकारक केले पाहिजे व अशी अट करारनाम्यात समाविष्ट करणेत यावी याबाबत मा.आबा बागुल यांचे दि.३०/७/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३८० दि. ११/८/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/३५८ दि.१३/१०/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**विषय क्र. ६३५**

पुणे शहरातील सलून दुकानदारास प्रत्येकी ५००० रुपयाची आर्थिक मदत करण्याबाबत मा.हरिदास चरवड यांचे दि.६/७/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३०६ दि. १४/७/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/एचओ/३६७ दि.१३/१०/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. ६३६**

पुणे मनपाच्या बॅच मिक्स प्लान्टमार्फत पुणे शहरातील मुख्य रस्त्यांची व ताब्यात आलेल्या गावांमधील विविध रस्त्यांवर आवश्यकतेनुसार रिसर्फेसिंगची कामे करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार यांचेकडून परिमाण विभागून (टेंडर र.रु. ८९,२७,३८६/– पेक्षा २१.२१% कमी) मे.बाळासाहेब एन्टरप्रायजेस यांचेकडून र.रु.३५,१६,९४३=७१ पर्यंत व मे.योहान इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रक्टर्स यांचेकडून र.रु.३५,१६,९४३=७१ असे एकूण र.रु. ७०,३३,८८७=४३ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ८,४४,०६६=४९ पर्यंत काम करुन करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस व सदरचे काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने प्राईज बिड दिनांकापासून काम करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३५३ दि. १३/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ६३७**

पुणे मनपाच्या बॅच मिक्स प्लान्टमार्फत कार्यकारी अभियंता (पथ) झोन क्र. ५,६,७ व ८ यांच्या अखत्यारितील विविध मुख्य रस्त्यांवर आवश्यकतेनुसार रिसर्फेसिंगची कामे करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार यांचेकडून परिमाण विभागून (टेंडर र.रु. ८९,२७,३८६/– पेक्षा २१.२१% कमी) मे.बाळासाहेब एन्टरप्रायजेस यांचेकडून र.रु.३५,१६,९४३=७१ पर्यंत व मे.भवानी कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रु.३५,१६,९४३=७१ असे एकूण र.रु. ७०,३३,८८७=४३ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ८,४४,०६६=४९ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस व सदरचे काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने प्राईज बिड दिनांकापासून काम करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३५४ दि. १३/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ६३८**

पुणे मनपाच्या येरवडा बॅच मिक्स प्लान्टमार्फत रस्ते रिसर्फेसिंग व इतर दुरुस्ती विषयक कामाकरिता क्रश सॅण्ड पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार यांचेकडून परिमाण विभागून (टेंडर र.रु. ९५,२०,०७१/- पेक्षा १२.००% कमी) मे.रेडीयंट कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रु.५०,२६,५९७=४९ पर्यंत व मे.सातव स्टोन कंपनी प्रा.लि. यांचेकडून र.रु.३३,५१,०६४=९९ असे एकूण र.रु. ८३,७७,६६२=४८ अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,१८,८८३=१२ पर्यंत काम करुन करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस व सदरचे काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने प्राईज बिड दिनांकापासून काम करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३५५ दि. १३/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ६३९**

पुणे मनपाच्या बॅच मिक्स प्लान्टमार्फत कार्यकारी अभियंता (पथ) झोन क्र. १,२,३ व ४ यांच्या अखत्यारितील विविध मुख्य रस्त्यांवर आवश्यकतेनुसार रिसर्फेसिंगची कामे करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार यांचेकडून परिमाण विभागून (टेंडर र.रु. ८९,२७,३८६/- पेक्षा १७.८१% कमी) मे.जय शिवशंकर कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रु.३६,६८,७०९=२७ पर्यंत व मे.सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रु.३६,६८,७०९=२७ असे एकूण र.रु. ७३,३७,४१८=५५ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ८,८०,४९०=२२ पर्यंत काम करुन घेणेस, त्यांचेबरोबर करार करणेस व सदरचे काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने प्राईज बिड दिनांकापासून काम करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३५६ दि. १३/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ६४०**

पुणे मनपाच्या येरवडा हॉट मिक्स प्लान्ट/बॅच मिक्स प्लान्ट येथुन पुणे शहरात डांबरी मिक्स मालाची वाहतूक करणेकरिता दैनंदिन कामासाठी हायवा, डंपर व मशिनरी भाडेतत्वावर घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बालाजी अर्थमुव्हर्स ॲण्ड लॅण्ड डेवेलोपर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९४,२८,३८०/- पेक्षा १०.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८४,८५,५४२/- पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,६५,७०२=८० पर्यंत काम करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३५७ दि. १३/१०/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ६४१**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार व मा.दिपक पोटे यांचे दि. २९/६/२०२० चे पत्र.

पुणे शहरात कोविड-१९ विषाणू संसर्ग रोखणेकामी उपाययोजना व उपचार करणेकरीता विविध साधनसामुग्री खरेदी करणेसाठी र.रुपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक,हेरिटेज अंतर्गत विविध कामे करणे, पान क्र. २७४, यादी क्र. एसजे२१, बजेट कोड- सीई२२अे७०५/एसजे२१-३४, प्रभाग क्र. १५ क मध्ये जुने मंडई जतन व संवर्धन संग्रहालय करणे | १ कोटी | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| पुणे शहरामध्ये हेल्थ प्लॅन अंतर्गत रेफेरेन्स सेंटरमधील उपकरणे खरेदी व इतर खर्च बजेट कोड - आरई१७एफ१४७व्ही | -- | १ कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४२**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चॉंदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप,

मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४३**

सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात CE22A680 ह्या अर्थशिर्षका अंतर्गत हज हाऊस बांधणे या कामाची र.रुपये ११७.५० लक्ष तरतूद प्रभाग क्र. २७ कोंढवा खुर्द स.नं. ४७/१ येथील पुणे मनपाच्या ताब्यात असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर हज हाऊसच्या कामासाठीची तरतूद त्याच जागेवर सिव्हीक कल्चरल ॲण्ड कम्युनिटी सेंटर बांधणे या सद्यस्थितीत चालू असलेल्या कामासाठी वापरणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/७३२ दि.१९/११/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४४**

पुणे मनपा प्रशासनाने शहरातील बहुतांशी जाहिरातफल्कांना चुकीच्या पद्धतीन परवानगी व नुतनीकरणे दिलेले आहे. सदर परवानगी व नुतनीकरण दिलेले जाहिरातफलक प्रत्यक्षात जागेवर रस्त्यापासून १.५ मी. अंतराच्या आतमध्ये, जमिनीपासून ४० फुटांपेक्षा अधिक उंचीवर, नाले व नदीपात्रात तसेच पदपथ व रस्त्यावर देखील उभे केलेले आहेत. सदरील जाहिरातफलक हे प्रचलित कायद्याचा अनादर करणारे असून नागरिकांच्या जीवाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहेत. सदर बाब संबंधित परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा. उपायुक्त, मा. क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरिक्षक यांना ज्ञात असूनही प्रशासकीय निष्क्रियतेमुळे सदरील जाहिरातफलकांवर प्रत्यक्षात कारवाई होताना दिसत नाही. प्रशासनाने सदरील कायद्याचा अनादर करणा-या व धोकादायक जाहिरातफलकांवर १५ दिवसात कारवाई न केल्यास भविष्यात दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचा मृत्यु झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित जाहिरातदार, परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा.उपायुक्त, मा.क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरीक्षक यांचेवर निश्चित करण्यात यावी याबाबत मा.रफिक शेख व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. २६/७/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६३९ दि. ६/८/२०१९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/६३८ दि.१४/१०/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४५**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६४९**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६५०**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६५१**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६५२**

जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्याबाबत मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४३ दि. ३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आकाशचिन्ह.पर./१०६० दि.७/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६५३**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br><br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६५४**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/- व लहान मुलांसाठी र.रु. ५/-, मासिक पास र.रु. २००/- व विदेशी नागरिक र.रु. १००/- दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकीर्ण**

**विषय क्र. ६५५**

हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र बंद करणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी ठेकेदार मे.सागर वॉटर मॅनेंजमेंट ॲण्ड सर्व्हीसेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३)(क) अन्वये नेमणूक करणेस मान्यता मिळणेसाठी, तसेच खालील बाबी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/३५९ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१. मे.सागर वॉटर मॅनेंजमेंट ॲण्ड सर्व्हीसेस यांचेकडून दि. ०७/०७/२०२० रोजीपासून सदरचे काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस.
२. मे.सागर वॉटर मॅनेंजमेंट ॲण्ड सर्व्हीसेस यांचेकडून दि. ०७/०७/२०२० रोजीपासून करण्यात आलेल्या कामाचे बिल वेळोवेळी अदा करणेस.
३. सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार दि. ०७/०७/२०२० रोजी पासून सुरू करून सदरचे काम संपेपर्यंत काम करून घेणेस.

**विषय क्र. ६५६**

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोविड-19 अंतर्गत विलगीकरण कक्ष, कोविड केअर सेंटर व आवश्यक ठिकाणी वॉटर प्युरिफायर, हॅन्ड वॉश बेसिन बसविणे हे काम अत्यावश्यक व तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/३६० दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१. पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड वसतीगृह येवलेवाडी, ट्रिनिटी कॉलेज वसहतीगृह, कै.दरेकर शाळा, कोंढवा बु, सिंहगड शाळा टिळेकरनगर येथे स्थापित केलेल्या केंद्रासाठी वॉटर प्युरिफायर, हॅन्ड वॉश बेसिन पुरविणे व बसविणे इत्यादि कामे करून घेणस व झालेल्या कामाचे बिले G.S.T, अन्य करांसहित खालील अर्थशिर्षकामधून आदा करणे.

‘‘सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी -RE17F257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२.मे. राजवीर कन्स्ट्रक्शन यांचेशी करार करुन दि.२/७/२०२० पासून केलेल्या कामाचे बिल आदा करणेस.

३.वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार करणेस

**विषय क्र. ६५७**

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत कै.दरेकर शाळा, कोंढवा बु, सिंहगड शाळा टिळेकरनगर व अन्य ठिकाणी स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/ CCC केंद्रासाठी विविध स्थापत्य विषयक कामे मे. समर्थ कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडून दि.१५/०६/२०२० पासून करून घेणस व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.

मआ/प.क्र.४/३६२ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१. पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत कै.दरेकर शाळा, कोंढवा बु, सिंहगड शाळा टिळेकरनगर व अन्य ठिकाणी स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/ CCC केंद्रासाठी विविध स्थापत्य विषयक कामे मे. समर्थ कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडून दि.१५/०६/२०२० पासून करून घेणस + G.S.T व अन्य कर देणेस तसेच झालेल्या कामाचे बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणे.

‘‘सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी -RE17F257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२.मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांचेशी करार करणेस.

३.वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार दिनांक १५/०६/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस.

**विषय क्र. ६५८**

परिमंडळ क्र.३ सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कोरोना हॉटस्पॉट झालेले प्रधिबंधित क्षेत्रातील पर्वती जनता जयभवानीनगर, पर्वती स.नं.१३१, पानमळा, पर्वती स.नं.१३० दांडेकर पुल व पर्वती स.नं.१३२ राजीव गांधीनगर येथील घोषीत वस्त्या सिंहगड रोड या मुख्य रस्त्यालगत असल्याने त्याभोवती लोंखडी पत्र्याचे पार्टीशन करणे व सदर वस्तीतील शौचालये दिवसातुन ५ वेळा स्वच्छ करुन सॅनिटाईज करणे अशा स्वरुपाची कामे पुणे म.न.पा. कडील ठेकेदाराकडुन स्वयंरोजगार संस्थामार्फत सन २०१९-२० चे शेड्युल मान्य दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये केलेल्या खर्चाबाबतची माहिती मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांच्याकडे पश्चात अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/३६८ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१) मे.सार्थक कन्स्ट्रक्शन यांनी परिशिष्ट(अ)प्रमाणे पर्वती जनता वसाहत व जय भवानी नगर येथे केलेल्या पत्रापार्टीशनचा खर्च र.रु.२०,४२७.२६ आणि १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.२२,८७८.५३ आदा करणेस.

२) मे.जगन्नाथ मंडप डेकोरेटोर (प्रो.प्रा. श्रीमती पुजा मच्छिद्र लांडगे) यांनी परिशिष्ट (ब)प्रमाणे (१)पर्वती स.नं.१३१ पानमळा(२) पर्वती स.नं.१३० दांडेकर पुल व (३) पर्वती स.नं.१३२ राजीव गांधीनगर येथे केलेल्या पत्रापार्टीशनचा खर्च र.रु.४,२६,१६९.९३ आणि १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.४,७७,३१०.३२ आदा करणेस.

३) मे.जनहितम स्वयंम रोजगार सेवा सह.संस्था म. पुणे यांनी शौचालये साफसफाईचे कामास परिशिष्ट(क) प्रमाणे खर्च र.रु.१०,७१,४२०.०० आणि १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.११,९९,९९०.४० आदा करणेस.

४) मे.विश्वास आधार स्वयंम रोजगार सेवा सह.संस्था म. पुणे यांनी शौचालय स्वच्छतेच्या कामांचा परिशिष्ट(क)प्रमाणे खर्च र.रु. १०,७१,४२०.०० आणि १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु. ११,९९,९९०.४० त्यांना आदा करणेस.

५) वरील कामांचा खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस

अर्थशिर्षक :- सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक
Covid 19 अंतर्गत महसुली कामांसाठी (खर्च)
RE17F257

६) वरील अ.क्र.(१) ते (४) प्रमाणे कार्यवाही व अमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क)प्रमाणे कामे संपेपर्यंत करुन घेणेस.

**विषय क्र. ६५९**

वानवडी-रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके प्राथमिक शाळा, वानवडी येथे स्थापित केलेल्या विलगीकरण कक्षासाठी दि.२०/०६/२०२० पासून स्थापत्य विषयक कामे करणे हे काम अति तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये करणेत आले बाबत खालील बाबी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/३६९ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१) वानवडी-रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके प्राथमिक शाळा, वानवडी येथे स्थापित केलेल्या विलगीकरण कक्षासाठी दि.२०/०६/२०२० पासून स्थापत्य विषयक कामे करणे या केलेल्या कामांना पश्चात मान्यता मिळणेस,त्यासाठी ठेकेदार मे. प्रो. विनायक श्रीकांत ओव्हाळ यांचेशी करारनामा करणेस व प्रत्यक्ष झालेल्या कामांच्या मोजमापानुसार बिल अदा करणेस.( अंदाजीत पू. ग. प. र.रु. ९९९६३७.५२ )

२) या होणाऱ्या कामाचे दि. २०/०६/२०२० पासूनचे बिल खालील अर्थशिर्षकामधून आदा करणेस.
महसुली कामांसाठी –RE17F257
Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार दिनांक २०/०६/२०२० पासून सदरचे काम संपेपर्यंत करणेस.

**विषय क्र. ६६०**

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयाकरीता धनकवडी येथील लोकनेते ना.शरदचंद्र पवार बहुद्देशीय भवन येथे स्वॅब सेंटर उभारण्याकरीता इमारतीमधील सामान हलविणे, आवश्यक स्थापत्य विषयक कामे करणे व आवश्यक साहित्य (सन २०१९–२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने) खरेदी करुन पुरविणे हे काम मे. कृष्णा कंस्ट्रकशन यांचेकडून करुन घेण्यात आल्याने तसेच सेंटर स्थापित झाल्यानंतर सेंटरवर दररोज स्वॅबकरीता येणा–या नागरिकांना व सेंटरवरील सेवकांना सकाळचा चहा, नाष्टा, दुपारचे जेवण, दुपारचा चहा व संध्याकाळचे जेवण व गरजेनुसार पाण्याचे जार व बाटली पुरविणे इत्यादी कामे मे. संगम फाऊंडेशन (प्रो. प्रा. कृष्णा माळी) यांचेकडून तसेच स्वॅब सेंटर येथील दैंनदिन साफ सफाई ठेकेदार मे. शारदा सर्व्हिसेस (प्रो. प्रा. जयशंकर उपाध्याय) यांचेकडून करुन घेत असल्याने सदर कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करणेस मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता मिळाली असून सदर बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा यांचे निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/३७० दि.१३/१०/२०२० चे पत्र.

(१)मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केल्याप्रमाणे बाब क्र. A नुसार स्वॅब सेंटर येथे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ १ मध्ये दर्शविलेप्रमाणे स्थापत्य विषयक कामे करुन घेतलेल्या कामास व केलेल्या कामाचे र. रु. ४,०१,८३३.६४/– चे बील आदा करणेस

(२)मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केल्याप्रमाणे बाब क्र. B नुसार स्वॅब येथे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ २ मध्ये दर्शविलेप्रमाणे स्वॅब सेंटरसाठी आवश्यक साहित्याचे कामे करुन घेण्यात आलेल्या खरेदीस व केलेल्या खरेदीचे र. रु. १,६०,७५१/– चे बील आदा करणेस

(३)मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केल्याप्रमाणे बाब क्र. C (१)नुसार स्वॅब सेंटर येथे ठेकेदार मे. संगम फाऊंडेशन यांचेकडून परिशिष्ठ ३ मध्ये दर्शविलेप्रमाणे नागरिकांना पुरविण्यात आलेल्या सकाळचा चहा, नाष्टा, दुपारचे जेवण, व संध्याकाळचे जेवण पुरविणे व केलेल्या कामाचे र. रु. ३,९४,४०८/– चे बील आदा करणेस

(४)मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केल्याप्रमाणे बाब क्र. C (२)नुसार स्वॅब सेंटर येथे ठेकेदार मे. संगम फाऊंडेशन यांचेकडून परिशिष्ठ ४ मध्ये दर्शविलेप्रमाणे नागरिकांना पुरविण्यात आलेल्या दुपारचा चहा, बिस्कीट व आवश्यकतेनुसार पिण्याचे पाणी पुरविणे व केलेल्या कामाचे र. रु. १,३८,५२२.७२/– चे बील आदा करणेस

(५)मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केल्याप्रमाणे बाब क्र. D नुसार स्वॅब सेंटर येथे ठेकेदार मे. शारदा सर्व्हिसेस यांचेकडून परिशिष्ठ ५ मध्ये दर्शविलेप्रमाणे स्वॅब सेंटर येथे दैनंदिन साफसफाई विषयक कामे यांचेकडून करुन घेणेस व केलेल्या कामाचे र. रु. २,०४,५३५.०१/– चे बील अदा करणेस

(६)मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केल्याप्रमाणे बाब क्र. E नुसार स्वॅब सेंटर येथे दैंनदिन काम सुरळीत राहण्याच्या दृष्टीने ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ ६ मध्ये दर्शविलेप्रमाणे पुरविण्यात आलेल्या कुशल व अकुशल कामगार या कामास व केलेल्या कामाचे र. रु. २,२३,८७४.२१/- चे बील आदा करणेस

(७)वरील बाब क्र. १ ते ६ या कामांचा खर्च खालील अर्थशिर्षकावर अदा करणेस

सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

१ मुख्य देखरेख वसुली वगैरे,थ आपत्ती व्यवस्थापन विभाग,

थ १ नैसर्गिक आपत्तीग्रस्स्त/ अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत.

RE11R101

(८) ठेकेदार मे.कृष्णा कंस्ट्रक्शन, मे. संगम फाऊंडेशन व मे.शारदा सर्व्हिसेस यांचेशी करारनामा करणेस

वरील अ.क्र. १ ते ८ ची अमंलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) नुसार दि. १४/०७/२०२० पासून पुढील काळासाठी स्वॅब सेंटर चालू असे पर्यंत व सदरचे काम संपेपर्यंत करणेस

विषय क्र. ६६१

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पुणे म.न.पा.चे कै.मुरलीधर लायगुडे या हॉस्पीटल इमारत व पोकळे शाळा येथे पुणे मनपा तर्फे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन /CCC क्रेंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या कोरोना बाधित नागरिकां दैनंदिन सकाळी चहा , नाश्ता, दुपारचे जेवण, गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल व इतर आवश्यक बाबी तयार अन्न पुरविणे या कामाचे एजन्सी १) मे.रूचिरा केटरर्स २) मे.आदित्य सप्लायर्स या एजन्सी कडुन दि.०१/०८/२०२० व दि.३१/८/२०२० पासुन काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने खरेदी करुन पुरविणेत आलेल्या बाबी व त्याचा खर्च महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये सदर बाब मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांच्याकडे पश्चात माहीतीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/३७१ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१) कै.मु.पां.लायगुडे हॉस्पिटल येथे मे.रूचिरा केटरर्स यांनी सदर ठिकाणी दि १/८/२०२० ते दि. ३१/८/२०२० अखेर दररोज सकाळी चहा व नाष्टा आणि दुपारी चहा व बिस्किट, दुपारचे व संध्याकाळचे जेवण असे पदार्थ पुरविलेले आहेत त्यांनी केलेल्या कामाचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेल्या परिशिष्ठ (अ१), व (अ२) असे या सोबत असून त्यांचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेल्या परिशिष्ठ (अ१) प्रमाणे सकाळी नाष्टयाचा खर्च र.रु.९३००/- येत असुन +१०% जी.एस.टी.सह एकुण र.रु.१०,२३० /- खर्च अदा करणेस तसेच कै.मु.पा.लायगुडे हॉस्पिटल येथे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ठ (अ२) प्रमाणे मे.रूचिरा केटरर्स यांनी दिं. १/८/२०२० ते दि ३१/८/२०२० अखेर दररोज दुपारचे व संध्याकाळचे जेवण प्रतीताट र.रू.७५ /- माणसी पुरविलेले असून जुलै महिन्याचा जेवणाचा खर्च र.रु.६९७५०/- होत असुन +१०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.७६,७२५/- खर्च अदा करणेस.

२) कै.वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळा अवेटेड कक्ष येथे मे.आदित्य सप्लायर्स यांनी सदर ठिकाणी दररोज गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविलेले आहेत त्यांनी केलेल्या कामाचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेल्या परिशिष्ठ (ब) नुसार असे या सोबत असून त्यांचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रा सोबत जोडलेल्या परिशिष्ठ (ब) प्रमाणे बिस्लेरी पाणी बॉटल खर्च र.रु.२२,२७२/- येत असुन +१०% जी.एस.टी.सह एकुण र.रु.२४,४९९.२०/- खर्च अदा करणेस.

३) वरील १ व २ प्रमाणे खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस.

अर्थशिर्षक - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

Covid-19 अंतर्गत अत्यावश्यक भांडवली महसूल कामासाठी (खर्च)

**RE17F257**

वरील अ.क्र. (१)व (२) ची माहे ऑगस्ट २०२० मधील झालेल्या कामाची कार्यवाही व अमंलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये सदर ठिकाणचे काम संपेपर्यंत करून घेण्यास.

**विषय क्र. ६६२**

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पुणे म.न.पा.चे कै.मुरलीधर लायगुडे या हॉस्पीटल इमारत व पोकळे शाळा येथे पुणे मनपा तर्फे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन /CCC क्रेंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या कोरोना बाधित नागरिकांना तसेच सिंहगड कॉलेज,ओंकार हॉटेल मधील निवासी डॉक्टरांसाठी दैनंदिन सकाळी चहा , नाश्ता, दुपारचे जेवण,सायंकाळी चहा व बिस्किट,रात्रीचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे, गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल व इतर आवश्यक बाबी तयार अन्न पुरविणे या कामाचे एजन्सी १) मे.रूचिरा केटरर्स २) मे.आदित्य सप्लायर्स ३)भाग्यश्री एन्टरप्रायझेस या एजन्सी कडुन दि.०१/०६/२०२० व दि.३०/०६/२०२० पासुन आणि स्थापत्य विषयक कामे मे.भाग्यश्री एन्टरप्रायझेस यांचेकडुन सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने खरेदी करुन पुरविणेस व सदर चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये करणेस पश्चात मान्यता मिळणेविषयी, तसेच सदर बाब मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांच्याकडे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/३७२ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१) मे.भाग्यश्री एन्टरप्रायझेस यांचे कडून कै.वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळे मध्ये माहे जुन महिन्यात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे काम केलेल्या कामाचे परिशिष्ठ (अ)प्रमाणे र.रू.१८,७९८.०८ एवढा होत आहे तो त्यांना आदा करणेस.

२) कै.मु.पा.लायगुडे हॉस्पिटल व वस्ताद हरिभाऊ पोकळे येथे मे.आदित्य सप्लायर्स यांनी सदर ठिकाणी दररोज गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविलेले आहेत त्यांनी केलेल्या कामाचे परिशिष्ठ (ब१) व (ब२) नुसार र.रु.२८,७२३=२०+ र.रु.७३,०७५=२० = र.रु. १,०१,७९८=४ असा खर्च होत आहे तो त्यांना अदा करणेस.

३) कै.मु.पां.लायगुडे हॉस्पिटल येथे मे.रूचिरा केटरर्स यांनी सदर ठिकाणी दिं ०१/०६/२०२० ते ३०/०६/२०२० अखेर दररोज सकाळी चहा व नाष्टा आणि दुपारी चहा व बिस्किट,सकाळी व दुपारचे दुध तसेच दुपारचे व संध्याकाळचे जेवण असे पदार्थ पुरविलेले आहेत त्यांनी केलेल्या कामाचे परिशिष्ठ (क१),(क२),(क३) व (क४) असे र.रु.५७,७५०/- + र.रु. १८,९२०/- + र.रु. १,३०३=०५ + र.रु.२,९१,८०२=५० = र.रु. ३,६९,४७६/- हा खर्च अदा करणेस.

४) तसेच सिंहगड कॉलेज, ओंकार हॉटेल मधील निवासी डॉक्टरांसाठी परिशिष्ट (ड) प्रमाणे मे.रूचिरा केटरर्स यांनी दि.१/६/२०२० ते दि.३०/६/२०२० अखेर दररोज सकाळचा नाष्टा प्रतिनग र.रु.२०/- माणसी व दुपारचे जेवण प्रतीताट र.रु. ७५/- माणसी पुरविलेले असून जुन महिन्याचा नाष्टा व जेवणाचा खर्च र.रू.५६,७४०/- होत असून + १०% जी.एस.टी सह एकूण र.रू.६२,४१४/- एवढा खर्च करणेस

५) वरील १ व ४ प्रमाणे खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस.

अर्थशिर्षक - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

Covid-19 अंतर्गत अत्यावश्यक भांडवली महसूल कामासाठी (खर्च)

**RE17F257**

वरील अ.क्र. (१)व (४) ची माहे जुन २०२० मधील झालेल्या कामाची कार्यवाही व अमंलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये सदर ठिकाणचे काम संपेपर्यंत करून घेण्यास.

**विषय क्र. ६६३**

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड इन्स्टीट्युटचे मुलांचे वसतीगृह इमारत रायगड, पन्हाळा व मुलींचे वसतीगृह ए,बी,सी, गावडे शाळा, पोकळे शाळा येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन /CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी व दुपारी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे , गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे १)मे.मॉर्डन केटरर्स, २) मे.कॅफे साईलिला, ३)मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडुन दि.१२/०४/२०२० पासुन आणि स्थापत्य विषयक कामे मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये केलेल्या खर्चाबाबतची माहिती मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांच्याकडे पश्चात अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/३७३ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

१) सिंहगड कॉलेज येथील कोव्हिड १९ केअर सेंटर व कोरोना केअर सेंटर व रायगड, पन्हाळा, ए-पायास्वामी, बी-यमुना व सी-गोदावरी या इमारतीमध्ये अभियंता यांचे निदर्शनाखाली स्थापत्य विषयक कामे केली आहे. मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचे परिशिष्ट(अ)प्रमाणे दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० अखेर कोरोंटाईन सेंटर येथे स्थापत्य विषयक कामे करणे याचा एकुण खर्च र.रु.२,०९,२६५.६८ हा १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.२,३४,३७७.५६ त्यांना आदा करणेस.

२) मे.मॉर्डन केटरर्स यांचे परिशिष्ट(ब) प्रमाणे दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० अखेर गलर्स हॉस्टेलचे ए-पायास्वामी, बी-यमुना व सी-गोदावरी या इमारतीमधील रुग्णांना पुरविलेले २ वेळचे जेवणाचा खर्च र.रु.१९,५१,१२५/- हा १०% जी.एस.टी.सह र.रु.२१,४६,२३७.५० एवढा त्यांना आदा करणेस.

३) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(क)प्रमाणे दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० अखेर सकाळचा चहा, दुध व नाष्टा, दुपारचा चहा, दुध व आवश्यकतेनुसार पिण्याचे पाणी बिस्लेरी पाणी बॉटल इ.पुरविलेल्या पदार्थाचा खर्च र.रु.१२,०३,५७५/- हा. १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.१३,२३,९३२.५० आदा करणेस.

४) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(इ)प्रमाणे दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० अखेर सकाळचा व दुपारचा सिंहगड कॉलेज येथील कोरोना केअर सेंटरवर व अवेटेड सेंटरवर काम करणारे अधिकारी, अभियंते, डॉक्टर्स, नर्स, सुरक्षा रक्षक, वाहन चालक, सफाई कर्मचारी यांना पुरविलेल्या चहा/कॉफी यांचा खर्च र.रु.१,१४,७३०/- १०% जी.एस.टी. सह एकुण खर्च र.रु.१,२६,२०३/- त्यांना आदा करणेस.

५) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(ड)प्रमाणे दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० अखेर रायगड, पन्हाळा, धायरीतील पोकळे शाळा व पर्वती जनता वसाहत येथील गावडे शाळा येथे २ वेळेचे पुरविलेले जेवणाचा खर्च र.रु.१६,८६,६३९/- हा १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.१८,५५,३०२.९०/- त्यांना आदा करणेस.

६) वरील अ.क्र.१,२,३,४ व ५ प्रमाणे होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस.

अर्थशिर्षक :- सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

Covid 19 अंतर्गत महसुली कामांसाठी (खर्च)

RE17F257

७) वरील अ.क्र.१ ते ५ प्रमाणे माहे मे २०२० मधील झालेल्या कामांची कार्यवाही व अमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम क्र.६७(३)(क) अन्वये सदर ठिकाणचे काम संपेपर्यंत करुन घेण्यास.

**विषय क्र. ६६४**

पुणे, पेठ औंध सि.स.नं. १२०३, प्लॉट नं. २, स.नं. १८३(नविन) (जुना स.नं. ११८ ते १२४) येथील ६० फुटी डी.पी. रस्त्याने आरक्षित ६७.५० चौ.मी. जागेचा टी.डी.आर. देणेपोटी मालमत्ता व व्यवस्थापन या विभागामार्फत दि.२३/८/२०१९ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या क्षेत्राची, तडजोडीने ताब्याची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने सुरु असलेल्या भूसंपादनातील (एलए-४५१) ६० फुटी डी.पी. रस्त्याने आरक्षित ६७.५० चौ.मी. क्षेत्र भूसंपादन कार्यवाहीतुन वगळणेबाबत व तेवढया क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही कायमस्वरुपी रद्द करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे तसेच मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे यांना कळविणेत येत

असुन सदरची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भुसंपादन/३७४ दि. १३/१०/२०२० चे पत्र.

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.